## प्रेसनोट

# " मुलीकरीता संरक्षण शिबीराचे आयोजन"

जा.क्र. ६५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०९/२०१७

साकोली :– आज दिनांक १३/०९/२०१७ ते १७/०९/२०१७ रोजी भंडारा पोलीस दल व राज्य महिला आयोग यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक व संरक्षण प्रशिक्षण शिबीराचे आयोजन साकोली येथील मनोहरभाई पटेल महाविदयालय येथे घेण्यात आले. या शिबीरात मुलींनी स्वताचे ध्येय ठरवा ते पुर्ण करण्यासाठी आत्मनिर्भय व्हा, स्वक्षम बना, अन्यायाचा प्रतीकार करायला शिक्षा, अन्याय अत्याचार झाल्यास पोलीस स्टेशनला तक्रार करा तसेच फेसबुक सोशल मिडीया या आधुनीक तंत्र ज्ञानातुन फसवणुक होवु शकते, या तंत्राचा सुरक्षीत वापर करुन धोके ओळखा असे प्रतीपादन मा. पोलीस अधिक्षक विनीता एस. यांनी केले.

यावेळी जिल्हा सत्र न्यायाधीश संजय देशमुख यांनी प्रंचड प्रयत्न करा, अपयश आले तरी अपयश पचवता आले पाहीजे. अभ्यासातुन ज्ञान मिळवा, त्याने तुम्हच्यात आत्मविश्वास निर्माण होईल. मुलींनो अर्धा तास व्यायाम करा, रोज देशी गाईचे दुध प्यावे. धैर्य हिमंत, स्वयंम स्वतामध्ये निर्माण करा, प्रामाणिक राहा. जिद्दीने ध्येय गाठा, अन्याय सहन करुन नका, मुलींनी आत्मनिर्भय बना असे सांगितले.

अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांनी साकोली तालुक्यात अल्पवयीन मुलींना फुस लावुन पळवुन नेणे, किंवा किशोरवयीन मुली पळुन जाणे असे प्रकार वाढले आहेत. मुलींना स्वतःचे महत्व समजुन घ्या, स्त्री ही वापरुन घ्यायची वस्तु नाही. मुलींनी स्वतःच्या करीअरवर स्वयंम केंन्द्रीत व्हावे उज्वल यश मिळवावे. तसेच डॉ. छाया कापगते यांनी मुलींना आरोग्या विषयी माहिती दिली.

स्वतःचे संरक्षण करण्याकरीता पोलीस विभाग तसेच महिला आयोगातर्फे स्वंरक्षण शिबीराचे आयोजन केले. तसेच मुलींकरीता ज्युडो कराटे प्रशिक्षण, पथनाटय (प्रेमविवाह), बाल संरक्षण भुमीका, बाल संरक्षण अधीनियम कक्ष, जबाबदा–या तसेच बाल संरक्षण अधीनीयम आणि घ्यावयाची काळजी यांचे प्रशिक्षण दिले.

उपविभागीय पोलीस अधीकारी श्रीकांत डिसले यांनी यशाचा मार्ग सांगितला. चारीत्र्य जपा, आई –वडीलांचे नाव कल्लकिंत होईल असे कोणतेही करु नका. असे प्रतिपादन केले. तसेच व्यासपीटावर उपविभागीय अधिकारी अर्चना मोरे, राज्य महिला आयोग सदस्य निता ठाकरे, एम.बी. पटेल कॉलेजचे प्राचार्य डॉ. त्रिवेदी, महिला आयोगाच्या जिल्हा समुपदेशक मृणाल मुनेश्वर, समन्वय वैशाली केळकर, शिक्षण विस्तार अधिकारी आर. एस. बांन्ते उपस्थित होते.

सुत्रसंचालन रेखा काशीवार आभार प्रदर्शन वैशाली केळकर यांनी केले.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.